महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,नागपूर विभाग,नागपूर

विभाग नियंत्रक,रा.प.नागपूर यांचे कार्यालय,गणेशपेठ बसस्थानकाच्या मागे,जाधव चौक,मॉडेल मिल रोड,नागपूर-४४००१८

ईमेल -dcstngp@gmail.com

दुरध्वनी क्र. ०७१२-२७२६२६७

---

क्र.राप/विनिना/आस्था/भरती/३४९२

दिनांक : १४ /०७/२०२५

प्रति,

संपादक,

नागपूर.

विषय : सन २०२५-२०२६ या वर्षाकरिता तांत्रिक शिकाऊ उमेदवार भरतीबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, म. रा.मा.प.महामंडळ,रा.प. नागपूर विभागामध्ये शिकाऊ उमेदवार सत्र २०२५-२०२६ वर्षाकरिता शिकाऊ उमेदवार भरती करावयाची असल्याने कृपया खालील बातमी आपल्या लोकप्रिय स्थानिक वृत्तपत्रात जनहितार्थ करावी,हि विनंती.

विभाग नियंत्रक,

राज्य परिवहन,नागपूर.

## बातमी

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,नागपूर विभाग,नागपूर.

## सन २०२५-२०२६ करिता शिकाऊ उमेदवारांसाठी प्रशिक्षणार्थी म्हणून निवड करण्याबाबत.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,नागपूर विभाग,नागपूर. मध्ये सन **२०२५-२०२६** सत्रासाठी वेगवेगळ्या व्यवसायाकरिता शिकाऊ उमेदवार (प्रशिक्षणार्थी) म्हणून **एकुण ३०० पदे (मॅकेनिकल मोटार व्हेईकल - १४०,डिझेल मेकॅनिक-७०, इलेक्ट्रिशियन / ॲटो इलेक्ट्रिशियन - ३०, यांत्रिक (प्रशितल व वातानुलीकरण)-१०,टर्नर (कतारी) - ०४,शिट मेटल वर्क-१०,पेंटर (साधारण)-१०,वायरमॅन -०४,कारपेंटर-०२,वेल्डर (सांधाता)-२०**

**सदर जागेपैकी अनुसूचीत जाती,अनु सूचीत जमाती व दिव्यांगाकरीता शिकाऊ उमेदवार कायद्यानुसार जागा आरक्षीत आहेत.)** Online पध्दतीने भरण्यात येणार आहेत.**त्यासाठी आय.टी.आय./व्यसायीक अभ्यासक्रम उत्तीर्ण** उमेदवारांनी **www.apprenticeshipindia.gov.in** या वेबसाइटवर स्वत;चे नोंदणी करावयाचे आहे व नोंदणी नंबर जनरेट झाल्यानंतर M.S.R.T.CORPORATION,NAGPUR DIVISION NAGPUR या आस्थापने (**Establishment**) करिता ऑनलाईन अर्ज सादर करणे बंधनकारक आहे,ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर रा.प. नागपूर विभागाचे विहीत नमुन्यातील छापील अर्ज भरुन सादर करणे आवश्यक आहे.या कार्यालयाचा छापील नमुन्यातील अर्ज विभागीय कार्यालय,**रा.प.नागपूर,गणेशपेठ बसस्थानकाच्या मागे,जाधव चौक,नागपूर** येथे दि.**१५.०७.२०२५ ते २३.०७.२०२५** रोजी पर्यंत **रविवार व सुट्टीचे** दिवस वगळुन **११.०० ते १६.००** या वेळेस व **शनिवारी १०.०० ते १२.००** या वेळेत मिळतील व स्विकारले जाईल.या कार्यालयातील छापील नमुन्यातील अर्ज भरुन देण्याची शेवटची तारीख दि.**२३.०७.२०२५** वेळ **१६.००** पर्यंत आस्थापना शाखा विभागीय कार्यालय,रा.प. नागपूर **स्विकारली जातील.सदरहु अर्जाची किंमत (GST १८%सहित) मागासवर्गीय व खुल्या प्रवर्गासाठी रु. ५९०/- तसेच अनु.जाती व अनु.जमातीसाठी रु.२९६/- आहे. आय.टी.आय./ व्यवसायीक (व्होकेशनल) अभ्यासक्रम मध्ये मागील ३ वर्षापुर्वी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही. तसेच ज्या शिकाऊ उमेदवाराने अर्ज सादर केला आहे त्याच उमेदवाराच्या नावाचा उल्लेख असलेला धनाकर्ष जमा करणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.**

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,नागपूर विभाग,नागपूर.
गणेशपेठ बसस्थानकाच्या मागे,जुने प्रादेशीक कार्यालय,नागपूर.

-- विवरण पत्र --

शिकाऊ उमेदवार भरती बाबतची जागेचा तपशील व शैक्षणिक व इतर पात्रता २०२५-२०२६.

| अ. क्र. | शिकाऊ उमेदवारी प्रवर्ग व्यवसायाचे नाव. | भरावयाच्या पदांची संख्या | शैक्षणिक पात्रता व ईतर अर्हता | विद्यावेतन |
|---|---|---|---|---|
| १ | यात्रिक मोटार गाडी (एम.एम.व्ही.) | १४० | यांत्रिक मोटार गाडी या व्यवसायातील आ.टी.आय./व्यवसायीक अभ्यासक्रम उत्तीर्ण | रा.प.नियमानुसार अदा करण्यात येईल. |
| २ | डिझेल मेकॅनिक | ७० | डिझेल मेकॅनिक या व्यवसायातील आ.टी.आय./व्यवसायीक अभ्यासक्रम उत्तीर्ण | रा.प.नियमानुसार अदा करण्यात येईल. |
| ३ | इलेक्ट्रिशियन / ॲटो इलेक्ट्रिशियन | ३० | इलेक्ट्रिशियन / ॲटो इलेक्ट्रिशियन या व्यवसायातील आ.टी.आय./व्यवसायीक अभ्यासक्रम उत्तीर्ण | रा.प.नियमानुसार अदा करण्यात येईल. |
| ४ | यांत्रिक प्रशितल व वातानुलीकरण | १० | यांत्रिक प्रशितल व वातानुलीकरण या व्यवसायातील आ.टी.आय./व्यवसायीक अभ्यासक्रम उत्तीर्ण | रा.प.नियमानुसार अदा करण्यात येईल. |
| ५ | टर्नर (कतारी) | ०४ | टर्नर (कतारी) या व्यवसायातील आ.टी.आय./व्यवसायीक अभ्यासक्रम उत्तीर्ण | रा.प.नियमानुसार अदा करण्यात येईल. |
| ६ | शिट मेटल (पत्रे कारागिर) | १० | शिट मेटल (पत्रे कारागिर) या व्यवसायातील आ.टी.आय./व्यवसायीक अभ्यासक्रम उत्तीर्ण | रा.प.नियमानुसार अदा करण्यात येईल. |
| ७ | पेंटर (साधारण) | १० | पेंटर (साधारण) या व्यवसायातील आ.टी.आय./व्यवसायीक अभ्यासक्रम उत्तीर्ण | रा.प.नियमानुसार अदा करण्यात येईल. |
| ८ | वायरमॅन (तारतंत्री) | ०४ | वायरमॅन (तारतंत्री) या व्यवसायातील आ.टी.आय./व्यवसायीक अभ्यासक्रम उत्तीर्ण | रा.प.नियमानुसार अदा करण्यात येईल. |
| ९ | कारपेंटर | ०२ | कारपेंटर या व्यवसायातील आ.टी.आय./व्यवसायीक अभ्यासक्रम उत्तीर्ण | रा.प.नियमानुसार अदा करण्यात येईल. |
| १० | वेल्डर (सांधाता) | २० | वेल्डर (सांधाता) या व्यवसायातील आ.टी.आय./व्यवसायीक अभ्यासक्रम उत्तीर्ण | रा.प.नियमानुसार अदा करण्यात येईल. |

**यांत्रीक पदाकरिता फ़क्त सरकारमान्य आय.टी.आय./व्यवसायीक अभ्यासक्रम चे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.यापुर्वि ज्यांनी रा.प. महामडळात मध्ये किंवा इतर ठिकाणी शिकाऊ उमेदवारी पुर्ण केली असेल किंवा सध्या चालु असेल ,त्यांनी अर्ज करु नये.**

**तसेच शिकाऊ उमेदवारांना रा.प.मध्यवर्ती कार्यालयाच्या वेळोवेळी प्राप्त झालेल्या सुचनेनुसार विद्यावेतन अदा करण्यात येईल.**

**विभाग नियंत्रक,**
**राज्य परिवहन,नागपुर**

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,नागपूर विभाग,नागपूर

विभाग नियंत्रक,रा.प.नागपूर यांचे कार्यालय,गणेशपेठ बसस्थानकाच्या मागे,जाधव चौक,मॉडेल मिल रोड,नागपूर-४४००१८

ईमेल -dcstngp@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१२-२७२६२६७


---

क्र.राप/विनिना/आस्था/भरती/३४९४ दिनांक : १४/०७/२०२५

प्रति,

१) सहाय्यक संचालक,जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्र,नागपूर
२) प्रकल्प अधिकारी,एकात्मीक विकास प्रकल्प, नागपूर.
३) अंशकालीन प्राचार्य,मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषांगिक सुचना केंद्र,(आय.टी.आय.) नागपूर.

विषय : सन २०२५-२०२६ या सत्राकरिता एक वर्षासाठी कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांची ऑनलाईन प्रक्रीयेद्वारे प्रशिक्षणार्थी म्हणून भरतीबाबत.

संदर्भ-- मध्यवर्ती कार्या.परिपत्रक क्र.११/२०१७ दि.२२.०३.२०१७.

**महोदय,**

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते कि,सोबत जोडलेल्या अधिसुचि पत्रात शिकाऊ उमेदवारांची एक वर्ष मुदतीकरिता सन **२०२५-२०२६** सत्रातील संदर्भिय परिपत्रकानुसार ऑनलाईन प्रक्रियेद्वारे प्रशिक्षणार्थी म्हणून भरती करण्यात येत आहे.

१) पात्र उमेदवारांनी निवडीकरिता संगणकीय प्रणाली सुरु झाल्याने शिकाऊ उमेदवारी सत्र २०२५-२६ पासून **आय.टी.आय.उत्तीर्ण व व्यवसायीक (व्होकेशनल) अभ्यासक्रम** उत्तीर्ण अभ्यासक्रम प्रत्येक उमेदवारांनी शिकाऊ उमेदवारी करणेकरीता **Skill India** पोर्टल वरील www.**apprenticeshipindia.gov.in** या वेबसाईटवर आधार लिंक करुन ऑनलाईन रजिस्ट्रेशन झाल्यानंतर **M.S.R.T.CORPORATION,NAGPUR DIVISION NAGPUR** या आस्थापने (Establishment) करिता ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

२) **वयोमर्यादा**--दि.**१५.०७.२०२५** रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.(मागासवर्गियांसाठी वयोमर्यादा ५ वर्ष शिथीलक्षम) त्याकरिता शासनाच्या सुधारीत नमुन्यातील १९९५ नंतरची दाखल्याची प्रमाणित केलेली छायांकीत प्रत जातीच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करावी

३) प्रशिक्षणा कालावधी ०१ वर्षाचा राहील.तसेच एकुण जागेपैकी **अनुसूचीत जाती,अनुसूचीत जमाती महिला व दिव्यांगासाठी शिकाऊ उमेदवारी कायद्यांतर्गत जागा आरक्षित आहे**. जे उमेदवार **सदरच्या वेबसाईटवर ऑनलाईन रजिस्ट्रेशन करतील** त्याच उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी करता येईल,म्हणजेच त्यांना शिकाऊ उमेदवार म्हणून भरती करण्यात येईल, व त्याच उमेदवारांचे करार अर्ज दाखल होतील.

४) ऑनलाईन करार केलेल्या उमेदवारांना या कार्यालयाचा छापील विहीत नमुन्यातील अर्ज भरावे लागतील.छापील विहीत नमुन्यातील अर्ज भरण्याची शेवटची तारीख **२३.०७.२०२५** वेळ **१६.००** वाजेपर्यंत आहे.ज्या उमेदवारांनी निव्वळ **ऑनलाईन करार** करुन अप्लाय केल्यानंतर **दि.२३.०७.२०२५** रोजी वेळ **१६.००** वाजेपर्यंत या कार्यालयाचा छापील विहीत नमुन्यातील अर्ज भरुन सादर करावा लागेल, तसेच दिलेल्या मुदतीत विहीत नमुन्यात,नमुद शुल्कासह अर्ज सादर केला नाही ,त्या उमेदवारांचा निवडीचा **विचार केला जाणार नाही.**

५) छापील अर्ज आस्थापना शाखा विभागीय कार्यालय,रा.प. नागपूर येथे दि.**१५.०७.२०२५ ते २३.०७.२०२५** रोजी पर्यंत **रविवार व सुट्टीचे** दिवस वगळुन **११.०० ते १६.०० व शनिवारी १०.०० ते १२.००** या वेळेस मिळतील व स्विकारले देखील जाईल.

६) विहीत नमुन्यातील छापील अर्ज सादर करतांना सदर अर्जासह (GST १८% सहित ) मागासवर्गीय व खुल्या प्रवर्गासाठी **रु.५९०/-** तसेच अनु.जाती व अनु.जमातीसाठी **रु.२९६/-** आहे. **डिमांड ड्राफ़** (डि.डि.) **M.S.R.T.C.Fund Account Nagpur.** यांचे नावे काढलेला नागपूर जिल्हा स्तरावरील बॅकेत अधिदानीत होणार राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ़ अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. **डिमांड ड्राफ़च्या मागे** उमेदवारांनी त्यांचे नाव व पत्ता तसेच **ट्रेडचे** नाव लिहीणे आवश्यक आहे.उमेदवाराने **जमा केलेले शुल्क परत केले जाणार** नाही. (**डिमांड ड्राफ़ (डि.डि.) हा उमेदवाराच्या नांवाचा असेणे आवश्यक आहे**)

७) मागासवर्गीय उमेदवारांनी मागासवर्गीय असल्याचा सक्षम प्राधिकारी,तालुका दंडाधिकारी यांनी दिलेल्या सुधारीत नमुन्यातील जातीच्या प्रमाणपत्राची छायांकीत प्रत सादर करावी.

८) दि.**२३.०७.२०२५** रोजी वेळ १६.०० वाजतानंतर ऑनलाईन करार केलेल्या उमेदवारांच्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही व ते रद्द समजले जातील व त्यांना या कार्यालयचा छापील नमुन्यातील अर्ज देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

९) उमेदवार मागील **०३ वर्षापुर्वी आय.टी.आय./व्यवसाय अभ्यासक्रम** उत्तीर्ण झालेला असेल तर त्यांचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१०) शिकाऊ उमेदवारांची मुलाखत प्रक्रिया रद्द केली असल्याने कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांची निवड ही त्यांनी मिळाविलेल्या आय.टी.आय./व्यवसाय अभ्यासक्रम उत्तीर्ण होऊन मिळालेल्या एकुण **प्राप्त गुणांच्या** टक्केवारीवर होईल.

११) उमेदवार अनुत्तीर्ण झाला व त्याच्या शैक्षणीक सत्रात **खंड पडला** तर(उत्तीर्ण केलेल्या प्रयत्नांचा विचार करुन) आय.टी.आय./व्यवसाय अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या एकुण प्राप्त गुणांवरील **टक्केवारी** न धरता ३५ टक्के गृहीत धरण्यात येतील.

१२) शिकाऊ उमेदवारीसाठी निवड झालेल्या उमेदवाराचे प्रशिक्षण सुरु होण्यापुर्वी त्यांचे रा.प. महामंडळाशी करार **(Online Contract)** केल्यानंतरच वैद्यकीय तपासणी करण्यात येईल व त्यात पात्र ठरणा-या उमेदवारांनाच शिकाऊ उमेदवारी करता येईल.जर रा.प. महामंडळाशी करार **(Online Contract)** झाला नाही,तर शिकाऊ उमेदवारी करता येणार नाही. **त्यामुळे CONTRACT FORM GENRATE होण्याच्या अधिन भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.**

१३) उमेदवाराची शिकाऊ उमेदवार म्हणून निवड केल्यानंतर उमेदवारांनी शिकाऊ उमेदवारी शैक्षणिक काळ संपण्यापुर्वी शिकाऊ उमेदवार शिकाऊ उमेदवारी सोडून गेल्यास अथवा गैरहजर राहिल्यास उमेदवारास पाठ्यवेतनाची रक्कम किंवा अप्रेंटीस ॲडव्हायझर ठरवतील, ती रक्कम नुकसान भरपाई म्हणून भरावी लागेल न भरल्यास अप्रेंटीसशीप कायद्यानुसार त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल.

१४) उमेदवारांची शिकाऊ उमेदवार म्हणुन निवड झाल्यास सदरची नेमणुक उमेदवारांच्या प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यानंतर त्यांना **राज्य परिवहन महामंडळात सहाय्यक पदामध्ये अथवा अन्य कोणत्याही पदात तात्पुरत्या अथवा कायमस्वरुपी सेवेसाठी कुठलाही आधार घेता येणार नाही किंवा प्रशिक्षण पुर्ण केले या आधारे सेवेत सामावुन घेण्याचे बंधन राज्य परिवहन महामंडळावर राहणार नाही**,याबाबत प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल.सदर शिकाऊ उमेदवार भरतीबाबतचे सर्व हक्क रा.प. महामंडळाकडे अबाधित आहेत.

**सदर जहिरीतीची एक प्रत सुचना फ़लकावर विदयार्थांच्या माहिती व पुढील कार्यवाही करिता प्रसिध्द करण्यात यावी.**

सोबत-विवरण पत्र

विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन,नागपूर.

प्रत सादर रवना-

१) प्रादेशिक व्यवस्थापक ,सनियंत्रण समिती क्र.०३.रा.प.नागपुर,यांचे माहिस्तव.

२) यंत्र अभियंता (चा)/विभा. वाहतूक अधिकारी/विभा.भांडार अधिकारी/विभा. कर्म.वर्ग. अधिकारी/कामगार अधिकारी/ विभा. अभियंता(स्था)/विभागीय लेखा अधिकारी/वरिष्ठ सुरक्षा दव दक्षता अधिकारी/विभा.वाह. अधिक्षक(अप),रा.प नागपूर

३) आगार व्यवस्थापक रा.प.घाटरोड/गणेशपेठ/इमामवाडा/वर्धमाननगर/काटोल/रामटेक/उमरेड/सावनेर आगार आपणास कळविण्यात येते की,सोबत पाठवलेली जाहिरात दोन साक्षीदारांच्या समक्ष सुचना फ़लकावर लावाली असल्याबाबतचा पुरावा आपल्या दफ़्तरी ठेवावे.

सोबत-विवरण पत्र

विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन,नागपूर.